0068620

FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, पहिली खबर क्र. 39, वर्ष 2023, दिनांक 14/12/2023
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. 1988, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...
3. (a) अपराधाची घटना : वार मंगळवार, तारीख पासून 07/11/2023 वेळ 16:00, तारीख पर्यंत 14/12/2023 वेळ 12.35
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 07/11/2023, वेळ 16:00
   Information received at P. S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 14/2023, तारीख 14/12/2023 वेळ 12.35
   General Diary Reference : Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of Information : समक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव आर.सी.एफ. पोलीस ठाणे, ठिकाणीचे नंबर माहुल रोड, मुंबई, गल्ली 400074, रस्त्याचे नाव ...
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा..., राज्य ...
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..., तालुका ..., जिल्हा..., राज्य ...
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव दिनेश वाघेला (b) वडिलांचे / पतीचे नाव गुलाब वाघेला
   Name Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय 54 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9821019682
   Date of Birth and Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ..., दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय ...
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion ... जात Caste ... जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता 1/33, सिंधी कॅम्प, M.G. बिल्डिंग, चेंबूर कॅम्प, चेंबूर मुंबई 400074, वस्ती / सर्व्हे नं. ... घर / नाव ... फोन / मो. नं. ... पॅन नं. ... वोटर्स नं. ...
   Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
   रस्त्याचे नाव ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण ..., गाव ..., पोस्ट..., पो. स्टे. ...
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ..., जिल्हा... राज्य ... सध्याचा पत्ता ...
   Taluka Dist. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   1) श्री कर्पे, (पद - वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आर.सी.एफ, पोलीस ठाणे)
   2) श्री जाधव, (पद - परि. पोलीस उपनिरीक्षक, आर.सी.एफ, पोलीस ठाणे)

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

3) श्री. मोजर, (पद - पोलीस हवालदार, आर.सी.एफ. पोलीस ठाणे)

Scanned with OKEN Scanner

वरील फिर्यादी श्री. दिनेश गुलाब वाघेला, वय 54 वर्षे, धंदा - व्यवसाय, (ज्वेलर्स), पत्ता - 1/33, सिंधी कॅम्प, M.S. बिल्डींग, चेंबुर कॅम्प, चेंबुर, मुंबई 74 यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदपत्रावर संगणकावर टंकलिखित करण्यात आला असून तोच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सही)

(मनिषा शेंडे)

सहा. पोलीस आयुक्त,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(सही)

दिनेश गुलाब वाघेला

जबाब

दिनांक १४.१२.२०२३

श्री दिनेश गुलाब वाघेला, वय ५४, धंदा– व्यवसाय (ज्वेलर्स), पत्ता – १/३३, सिंधी कॅम्प, एम.एस. बिल्डिंग, चेंबूर कॅम्प, चेंबूर, मुंबई ४०००७४. मोबाईल नंबर – ९८२१०१९६८२.

मी वरील पत्यावर पत्नी रंजना, मुलगे जिग्नेश व कल्पेश असे सुमारे २२ वर्षापासुन राहण्यास आहे. माझे प्रमाणिक ज्वेलर्स, पत्ता – चेंबूर कॉलनी, सि.जी. गिडवानी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७४ हे ज्वेलर्सचे दुकान असुन त्यामधुन मिळणाऱ्या मिळकतीवर आमचा उदरनिर्वाह चालतो. तसेच मी सावकारांचे जिल्हा निबंधक, पुर्व उपनगरे मुंबई यांचेकडून दिनांक ०१/०४/२०२३ पासून ते ३१/०२/२०२४ पर्यंत सावकारी परवाना क्र. आरबीई १८३२ मिळविलेला असून त्याची प्रत मी सादर करीत आहे. सावकारी परवान्यानुसार मी माझ्या ओळखीच्या व गरजु व्यक्तीना १८ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने तसेच सोने तारण ठेवून १५ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने पैसे देत असतो. परंतु १) श्री अरूण वामन भोसले – रूपये १३,२२,०००/– २) श्री अखिलेश रामचद्र मिश्रा – रूपये ३७,५०,०००/– ३) भवानजी अशोक वाघेला – रूपये २३,६७,३००/– ४) महेश सुरेश बावलिया – रूपये १७,००,०००/– यांनी विविध कारणांसाठी रोख रक्कम घेवून तसेच माझे दुकानातुन सोने खरेदी केलेले पैसे मला परत न करता माझी एकूण रूपये ९१,३९,३००/– इतक्या रक्कमेची फसवणूक केलेली आहे. सदरबाबत मी दिनांक १९/०४/२०२३ व १०/०७/२०२३ रोजी आर.सी.एफ. पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार अर्ज दिलेला होता.

सदर तक्रार अर्जाची चौकशी आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथील प्रोबेशनरी पी.एस.आय. श्री. राहुल जाधव हे करीत होते. दिनांक २०/०७/२०२३ रोजी माझे तकारीबाबत आरसीएफ पोलीस ठाणे येथे श्री जाधव यांनी जबाब नोंद केलेला आहे. त्यानंतर ऑगस्ट महिन्यामध्ये मी दिलेल्या तक्रार अर्जावर काय कारवाई केली याबाबत विचारणा करण्याकरीता मी सिनियर पी.आय. श्री. कर्पे साहेब, आरसीएफ पोलीस ठाणे यांची भेट घेतली असता त्यांनी मला माझे तक्रारीची फाईल पुढे वरिष्ठांकडे पाठविण्याकरीता ऑगस्ट महिन्यामध्ये रूपये १,००,०००/– इतक्या लाचेची मागणी केली व सदरची रूपये १,००,०००/– इतक्या लाचेची रक्कम ही दि ०३/०८/२०२३ रोजी मी कर्पे साहेब यांचे केबिनमध्ये जावून त्यांचे सांगण्याप्रमाणे अॅन्टी चेंबरमधील बेडवरील उशी खाली ठेवली. त्यानंतर दोन दिवसांनी प्रोबेशनरी श्री जाधव यांनी माझेकडे माझे तक्रार अर्जावर कारवाई करण्यासाठी रूपये ५०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली असता मी त्यांना रूपये २५,०००/– इतक्या लाचेची रक्कम आरसीएफ पोलीस ठाणेमध्ये जावून समक्ष भेट घेवून दिली. तसेच कर्पे साहेब यांचे असिस्टन्ट श्री गणेश मोजर यांनी देखिल माझेकडे या प्रकरणी कर्पे साहेबांकडून काम करून देण्यासाठी रूपये १०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली. त्यानुसार मी श्री गणेश मोजर यांना देखिल रूपये ५,०००/– इतक्या लाचेची रक्कम आरसीएफ पोलीस ठाणेमध्ये जावून समक्ष भेट घेवून दिली.

लोकसेवक कर्पे साहेब, जाधव साहेब व मोजर यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम मी त्याना देवूनही माझे तक्रार अर्जावर काहीच काम होत नसल्याने मी पुन्हा आर.सी.एफ पोलीस ठाणे येथे चौकशी साठी गेलो असता त्यांनी मला माझे तक्रार अर्जावरून गुन्हा दाखल करण्याकरीता २ लाख रूपयेची मागणी केली. म्हणून मी आर.सी.एफ पोलीस ठाणेमधील पहिल्या माळयावर एसीपी यांचेही ऑफीस असुन त्याची

दिनेश गुलाब वाघेला

Scanned with OKEN Scanner

भेट घेवुन लोकसेवक कर्पे साहेब, जाधव साहेब व मोजर यांनी माझेकडे माझे तकार अर्जावर कारवाई करण्यासाठी पैसे घेवुन काहीच कारवाई केली नसल्याबाबत तोंडी तकार केली. तरीदेखील माझे तकार अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही. जाधव साहेब यांनी माझे तकार अर्जासंदर्भात विचारले असता त्यांनी मला दि ०७/११/२०२३ रोजी पोलीस ठाणेमध्ये भेटण्यासाठी बोलावले होते. सदर भेटीदरम्यान जाधव साहेब हे माझेकडे पुन्हा लाचेची मागणी करण्याची शक्यता असल्याने व माझी वर नमुद पोलीसांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दि. ०७/११/२०२३ रोजी तकार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात समक्ष हजर राहुन लेखी तक्रार दिली.

सदर वेळी लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठांनी माझे तकारीच्या अनुषंगाने कारवाईकरिता सपोआ झेंडे मॅडम व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पोनि विद्या जाधव यांची नेमणुक केली. दिं ०८/११/२०२३ रोजी सपोआ झेंडे यांनी पडताळणी कारवाईकरीता स्वत:चे, माझे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर सपोआ झेंडे यांनी माझी व पंचाची पडताळणी कारवाईच्या पोलीस पथकासोबत ओळख करून दिली. त्यानंतर सपोआ झेंडे याच्या सुचनेप्रमाणे मी, पोनि विद्या जाधव, दोन पंच, पोलीस पथक व माझा मित्र श्री अनिल जिलाप्रकाश बेनिवाल असे पोलीस वाहनाने व माझी मो/कार क्र एम.एच.०३ सी.बी ५००६ मारूती सुझूकी या कारने चेंबूर जंक्शन या ठिकाणी जावून थांबलो व शासकीय वाहनास तेथेच थांबवून सपोआ झेंडे यांच्या सूचनेप्रमाणे मी, माझा मित्र श्री अनिल बेनिवाल, पोनि. विद्या जाधव व पडताळणी पथक असे माझ्या खाजगी वाहनाने आर सी एफ कॉलनी येथे जावून थांबलो. त्यानंतर मी माझ्या मुलास फोन करून माझी ॲक्टिवा मोटार स्कूटर घेवून आर सी एफ कॉलनी येथे येण्यास सागितले. सपोआ झेंडे यांच्या आदेशाने मला व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात आले व काही सुचना दिल्या त्याप्रमाणे मी व पंच असे मोटार स्कूटरवरून आर सी एफ पोलीस ठाणे येथे जावून सिनीयर पी आय कर्पे साहेब यांची दुपारी भेट घेतली असता माझी त्यांच्यासोबत कामासंदर्भात चर्चा झाली व त्यादरम्यान लोकसेवक श्री. कर्पे यांनी मला सांगितले की, तुमचे काम मी केले आहे पण वरिष्ठांनी तुमची फाईल परत पाठविली आहे. त्यावर मी लोकसेवक श्री. कर्पे यांना म्हणालो की, "आपके.. . कहने पे आपको मैने एक... एक तो दे दिया ना और क्या चाहिए साहब... कुछ तो करो मेरेको अभी आप एकदम चले जाओगे तो मै तो रखड जाउंगा साहब" त्यावर लोकसेवक श्री कर्पे यांनी "अभी ये उपर से नही हो रहा तुम उलटा उपर बोल रहा है पैसा दे के (अस्पष्ट आवाज)... क्या फालतुगिरी है" असे म्हणाले व मी तेथुन बाहेर निघुन आलो. त्यावेळी माझया अर्जाचे चौकशी अधिकारी जाधव हे पोलीस ठाणे येथे नसल्याने मी जाधव साहेब हे रात्री येणार असल्याने रात्री पुन्हा सपोआ झेंडे मॅडम यांचे सांगणेप्रमाणे पंच यांचेसह व्हॉईस रेकॉर्डर लावून आरसी एफ पोलीस ठाणे येथे जावून जाधव यांना भेटलो त्यानंतर रात्री पुन्हा तसेच मी जाधव साहेब यांचेसह लोकसेवक कर्पे यांचे केबीनमध्ये भेटण्यासाठी गेलो असता, कर्पे साहेब यांनी "तुम्हारा काम रूकेगा नही फिर... तुम्हारा काम ओके करके जाएगा... समझे क्या... त्याला सांगुन दया एवढ करायला" असे जाधव साहेब यांचेकडे बघून सांगितले. त्यावर मी "जो भी है ना वन टाईम बोल दो." असे सांगीतले. त्यानंतर मी जाधव साहेब यांचेसह केबीन च्या बाहेर आलो व पंच यांचेसह जाधव साहेब यांचे कामाच्या ठिकाणी बसलो. त्यानंतर जाधव साहेब पुन्हा वपोनी कर्पे साहेब यांचे केबिन मध्ये गेले व पुन्हा आमचेजवळ आल्यानंतर त्यांना मी माझे तक्रार अर्जावरुन गुन्हा दाखल करणेबाबत विचारले असता जाधव साहेब यांनी पंचासमक्ष माझेकडे त्यांचे मोबाईलमध्ये सोन्याच्या कॉईनचा फोटो दाखवुन "दो बोला... दस ग्राम. .. दस ग्राम का एक ये." असे बोलले त्यावर मी "तो फिर कॅश देवू क्या फिर ये एक... एकबीस देवू... फिर तुम खरीद लोगे कैसा... मेरेपास तो है नही" असे बोललो. त्यावर जाधव साहेब यांनी "मै कॅश लुंगा.. ." असे बोलुन रुपये ६०,०००/– व १० ग्रॅम सोन्याचा कॉईन घेवुन दि. ९/११/२०२३ रोजी दुपारी फोन

Scanned with OKEN Scanner

करून येण्यास सांगितले. तसेच दि. ८/११/२३ रोजी दुपारी जेंव्हा मी मोजर यांची भेट घेतली असता आमच्या मध्ये कामाबाबत चर्चा झाल्यानंतर मी "अभी नंदी का डिमांड इनोंने छोटासा डिमांड दस हजार मै दिया मै बोला... इनोंने जो दस हजार एक छोटा मोटा डिमांड किया..." त्यावर मोजर यांनी "किधर दस हजार दिया... पाच दिया... बघा... अभी पाच रह गऐ..." असे बोलुन रुपये ५०००/— ची लाचेची मागणी केली. तसेच यापूर्वी रुपये ५०००/— लाच घेतल्याचे मान्य केले त्यानंतर मी व पंच पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी येवुन माझे शर्टच्या आतमध्ये लावलेला व्हॉईस रेकॉर्डर सपोआ झेंडे यांचे ताब्यात दिला. त्यानंतर सपोआ झेंडे यांनी माझेकडे व पंचाकडे लाचेच्या मागणीबाबत खात्री केली.

तरी लोकसेवक जाधव साहेब व मोजर यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने सपोआ झेंडे यांनी दि. ०९/११/२०२३ रोजी मला लाचेची रक्कम घेवुन पुढील कारवाईकरीता जाण्यासाठी ला.प्र.वि. कार्यालयात बोलाविले. त्यानंतर मी माझे मोबाईलवरुन जाधव साहेब यांना फोन केले असता त्यांचा फोन बंद असल्याचे दिसुन आले. तसेच मी त्याचे कार्यालयात जावुन जाधव साहेब यांचेबाबत विचारणा केली असता जाधव साहेब यांची तब्येत ठिक नसुन ते कर्तव्यावर हजर नसल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सपोआ झेंडे यांनी लोकसेवक जाधव यांनी मला संपर्क केल्यास लगेच लाप्रवि कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

त्यानंतर दि. १७/११/२०२३ रोजी सपोआ झेंडे यांनी मला पुढील कारवाईकरीता लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत सांगितले असता, मी लाप्रवि कार्यालयात हजर राहुन जाधव साहेब यांचा अद्यापपर्यंत मोबाईल फोन बंद असल्याने ते दिवाळीनंतर संपर्क करण्याची शक्यता असल्याने १० दिवसानंतर पुढील कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली. परंतू जाधव साहेब यांचा मला फोन न आल्याने माझेकडे लाचेची मागणी केलेले अधिकारी हे पोलीस अधिकारी आहेत. तसेच त्यांनी पैसे घेवुन काम न केल्यामुळे मी त्यांची तक्रार त्यांचे वरिष्ठांकडे केली असल्याने मी त्यांची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडे केली असल्याची शंका वरील पोलीसांना आली असावी. त्यामुळे ते माझ्याकडून लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नसल्याचे मी दि. २९/११/२०२३ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर होवुन सपोआ झेंडे यांना सांगितले.

तरी दि. ०८/११/२०२३ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान सीनीयर पीआय कर्पे यांनी माझेकडून यापूर्वी १,००,०००/— रूपये रक्कम स्विकारल्याचे आमच्या संभाषणामध्ये स्पष्ट झाले आहे. तसेच वपोनी कर्पे यांनी स्वत:साठी जाधव साहेब यांच्या मार्फतीने माझे समक्ष लाचेची मागणी केली. त्याप्रमाणे पी एस आय जाधव यांनी माझेकडे १० ग्रॅम सोन्याचे एक कॉईन व ६०,०००/— रुपये अशी लाचेची मागणी करून ते स्विकारण्याचे कबूल केले. तसेच हवालदार मोजर यांनी रुपये ५०००/— अशी लाचेची मागणी करून गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी नमुद तिघांविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणेप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलिखित केला असुन मी तो वाचुन पाहीला असता तो माझया सांगणेप्रमाणे खरा व बरोबर आहे.

समक्ष

( सौ. मनिषा झेंडे )
सहा. पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

(दिनेश गुलाब वाघेला)

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादिकडून

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

[illegible] नमूद तारीख वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करण्यासाठी लो.आलोसे क्र.① व.पो.नि. कर्पे यांनी फि. यांचेकडून यापूर्वी 1,00,000/- रु. लाचेची रक्कम स्वीकारल्याचे त्यांचे संभाषणामुळे स्पष्ट झाले आहे. तसेच व.पो.नि. कर्पे यांनी स्वतः साठी प्र.पो.उ.नि. जाधव यांचे मार्फतीने फि. यांचेसमक्ष लाचेची मागणी केली. त्याप्रमाणे आलोसे क्र.② पो.उ.नि. जाधव यांनी फि. यांचेकडे 10 ग्रॅम सोन्याचे बिस्कीट व 60,000/- रु. रोख रकमेची लाचेची मागणी करून ते स्विकारण्याचे कबुल केले. तसेच आलोसे क्र.③ पो.ह. मोजर यांनी फि. यांचेकडे रु. 5000/- लाचेची मागणी करून गैरलाभ मिळवण्याचा प्रयत्न केला म्हणून आलोसे क्र. 1, 2 व 3 यांचेविरुद्ध कलम 7 भ्र.प्र. अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

सपोआ मनिषा झेंडे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank.............. No.............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................... (3) Transferred to P. S. ....................

District.......................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name मनिषा झेंडे

पदनाम Rank सहा. पोलीस आयुक्त,

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting लाप्रवि, मुंबई

Code No. of I. O. ....................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner